# १. इतर मागासवर्गीयांवर धार्मिक बंधन

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा
व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी १६८२/५८५५३/
(८९२)/का-५, दिनांक २९ जानेवारी, १९८३.

शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी १४६७/म. दिनांक १३ ऑक्टोबरर १९६७ नुसार शासनाने महाराष्ट्राच्या सर्व भागाकरीता एकत्रित अशी जातवार इतर मागासवर्गीयांची यादी प्रसिद्ध केली आहे. नंतरच्या काळात ती वेळोवेळी सुधारित करण्यात आली. ही यादी जातवार असल्यामुळे तिचा फायदा केवळ हिंदू आणि शिख धर्मातील लोकांना दिला जात असे. उपरोक्त धर्माच्या बंधनाबाबत शासनाने भारतीय घटनेतील तरतुदीच्या संदर्भात फेरविचार करून असा निर्णय घेतला आहे की, इतर मागासवर्गीयांच्या यादी संदर्भात कोणतेही धार्मिक बंधन लावण्यात येऊ नये आणि या यादीचा फायदा सर्व धर्मियांना देण्यात यावा. या निर्णयानुसार अनुक्रमांक १९५ तांबोळी या नोंदीपुढील ''मुस्लिम धर्मीय'' हा शब्द वगळण्यात आला आहे.

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१०७७/५०८७६/कार्यासन-५, दिनांक २१ मार्च १९७९ च्या सोबत जोडलेल्या सूचनांमधील सूचना क्रमांक २१ मधील खालील भाग रद्द करण्यात आला आहे. :-

**"The list of Other Backward Classes is on caste basis, Persons perfessing religion other than Hindu and Sikh cannot, therefore, be considered as belonging to Other Backward Classes. However, following communities professing Muslim religion are included in the list of Other Backward Classes : (i) Julaha, (ii) Laddaf, (iii) Pinjara, (iv) Momin, (v) Fakir Bandarwala and (vi)Tamboli."**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सही)
मु. प. दामले,
सहाय्यक सचिव